# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६० वा ❑ शुक्रवार दि.१२ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## दीपावली उत्सव युनेस्कोच्या वारसा यादीत

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

दिवाळी हा भारतीय अध्यात्म, सांस्कृतिक विविधता आणि सामाजिक एकतेचे एक महत्त्वाचे प्रतीक आहे. दिवाळी हा केवळ एक सण नाही तर अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्याचे प्रतीक आहे. भगवान रामाच्या पुनरागमनानंतर अयोध्या शहर सजवण्यासाठी दिवे लावण्याच्या परंपरेतून प्रतिबिंबित होणारी, दिवाळी आपल्याला आंतरिक ज्योत प्रज्वलित करण्याचा, वाईटावर चांगल्याचा विजय करण्याचा आणि जीवनात सकारात्मकता आणण्याचा संदेश देते. युनिस्केकडून दिवाळीचा सांस्कृतिक वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे.

भारतातील आणि जगभरातील लाखो लोकांसाठी दिवाळीचा प्रकाश आणखी खास बनला आहे. युनेस्कोने नवी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर झालेल्या बैठकीत मानवतेच्या अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या प्रतिनिधी यादीत दिवाळीचा समावेश करण्याची घोषणा केली. युनेस्कोचा हा निर्णय जागतिक स्तरावर भारताच्या सांस्कृतिक परंपरा जपण्यास मदत करेल. दिवाळीपूर्वी, अनेक भारतीय सांस्कृतिक परंपरांचा युनेस्कोच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. कुंभमेळा, गरबा, दुर्गा पूजा आणि आता दिवाळी.

युनेस्को च्या यादीत दिवाळीचा एक सांस्कृतिक वारसा म्हणून समावेश करण्यात आल्यामुळे

दिवाळीला आता जागतिक मान्यता मिळेल. जगभरात सांस्कृतिक देवाणघेवाण वाढेल. पर्यटन आणि संशोधनाला चालना मिळेल.

जागतिक स्तरावर भारताची सांस्कृतिक ओळख मजबूत होईल. दिवाळी हा उत्सव भारताची अध्यात्म, विविधता आणि सामाजिक एकता प्रतिबिंबित करतो. युनेस्कोच्या या पावलाचा उद्देश भारतीय परंपरा जपणे आणि जगभरात त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे हा आहे.

युनेस्कोच्या बैठकीत, १५० देशांतील ७०० हून अधिक प्रतिनिधींनी अमूर्त वारशावर चर्चा केली. या वर्षी ७८ देशांमधून ६७ नामांकने विचारार्थ सादर करण्यात आली. दिवाळीच्या समर्थनार्थ भारताने म्हटले आहे की दिवाळी हा केवळ एक सण नाही तर वाईटावर चांगल्याच्या विजयाचे, शांती आणि समृद्धीचे प्रतीक आहे. हा सण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाणारा वारसा म्हणून साजरा केला जातो.

युनेस्कोचा अमूर्त सांस्कृतिक वारसा काय आहे?

युनेस्कोच्या मते, अमूर्त सांस्कृतिक वारसा म्हणजे अशा पद्धती, ज्ञान, अभिव्यक्ती, वस्तू आणि ठिकाणे ज्यांना समुदाय त्यांच्या सांस्कृतिक ओळखीचा भाग मानतात. पिढ्यान्पिढ्या चालत आलेला हा वारसा कालांतराने विकसित होतो आणि सांस्कृतिक ओळख आणि विविधतेचा आदर मजबूत करतो.

युनेस्कोने १७ ऑक्टोबर २००३ रोजी पॅरिस येथे झालेल्या ३२ व्या सर्वसाधारण परिषदेत अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणासाठी २००३ चे अधिवेशन स्वीकारले. जागतिकीकरण, सामाजिक बदल आणि मर्यादित संसाधनांमुळे जिवंत सांस्कृतिक परंपरा, मौखिक पद्धती, कला, सामाजिक रीतिरिवाज, ज्ञान प्रणाली आणि हस्तकला धोक्यात येत आहेत या जागतिक चिंतेला प्रतिसाद म्हणून हे अधिवेशन तयार करण्यात आले.

पहिल्यांदाच भारताला यजमानपद

भारत ८ ते १३ डिसेंबर दरम्यान पहिल्यांदाच युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा समितीचे २० वे सत्र आयोजित करत आहे. या कार्यक्रमाचे ठिकाण म्हणून ऐतिहासिक लाल किल्ला परिसर निवडण्यात आला आहे. लाल किल्ला स्वतः युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांपैकी एक आहे, जो भारताच्या मूर्त आणि अमूर्त वारशाच्या संगमाचे प्रतीक आहे. युनेस्कोमधील भारताचे स्थायी प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा हे बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील. हा कार्यक्रम २००५ मध्ये भारताने २००३ च्या अधिवेशनाला मान्यता दिल्याच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केला जात आहे, जो जिवंत सांस्कृतिक परंपरांच्या जतनासाठी भारताची सतत वचनबद्धता अधोरेखित करतो.

भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत आहे. युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीमध्ये भारतातील अनेक अद्वितीय उत्सव, नृत्य, विधी आणि पारंपारिक कला समाविष्ट आहेत. या परंपरा केवळ भारताच्या सांस्कृतिक विविधतेचे प्रतिबिंबित करत नाहीत तर पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या जीवनशैली, श्रद्धा, कला आणि कौशल्यांचे जतन करतात. २००८ मध्ये, रामलीला युनेस्कोच्या अमूर्त सांस्कृतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यात आली. तेव्हापासून, भारतीय परंपरांचा या यादीत सातत्याने समावेश करण्यात आला आहे.

कुटियाट्टम, (केरळ) वैदिक जप,रामलीला, राममन, छाऊ नृत्य, बंगाल, झारखंड, ओडिशा) – पुरुलिया, सराईकेला आणि मयूरभंज, तिन्ही शैली त्यांच्या मनमोहक मुखवटे आणि युद्ध हालचालींसाठी प्रसिद्ध आहेत. कालबेलिया नृत्य (राजस्थान) मुडिएट्टू (केरळ)लडाखचे बौद्ध जप ,

मणिपूरचे संकीर्तन (२०१३) – वैष्णव परंपरेत रुजलेले हे धार्मिक गायन, ढोलकी आणि नृत्य भगवान श्रीकृष्णाच्या कथांचे थेट सादरीकरण आहे.

थाथेरस, पंजाबमधील तांबे आणि पितळ हस्तकला (२०१४) – जंडियाला गुरुच्या कारागिरांचा हा वारसा पारंपारिक धातूच्या वस्तू बनवण्याच्या अद्वितीय कलेचे प्रतिनिधित्व करतो.या सर्व प्रकारच्या कलांचा समावेश युनेस्कोच्या वारसा यादीत समावेश करण्यात आला आहे.

# जालन्यात शनिवार व रविवारी वारकरी संत साहित्य संमेलन

## वारकरी संत साहित्य संमेलनाच्या निमित्ताने संत विचारांची अभूतपूर्व अनुभूती!

ज्योतिर्मय साहित्य

**जालना** – महाराष्ट्र शसनाचा मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई व जेईएस महाविद्यालयात १३ आणि १४ डिसेंबर (शनिवार आणि रविवार) रोजी दोन दिवसीय वारकरी संत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य आणि स्वागताध्यक्ष डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी पत्रकार परिषदेत दिली. या प्रसंगी कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने , डॉ. हेमंत वर्मा,डॉ. राजेंद्र सोनवणे, डॉ. बी. जी. श्रीरामे यांची उपस्थिती होती.

महाविद्यालयाच्या चुन्नीलाल जी गोयल सभागृहात हे संमेलन होणार असून संमेलनाध्यक्ष म्हणून ह.भ.प. जगद्गुरू द्वाराचार्य डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर (नाशिक) हे भूषवणार आहेत.

उद्घाटन सोहळा व प्रमुख उपस्थिती – शनिवार (दि.१३) रोजी सकाळी ७.३० वाजता ग्रंथदिंडीने संमेलनाची सुरुवात होईल. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पासून या ग्रंथदिंडीची सुरुवात होऊन डॉ. राजेंद्र प्रसाद रोड (बडी सडक) मार्गे जेईएस महाविद्यालयात ही दिंडी पोहोचेल. या दिंडीत शहरातील भजनी मांडळे , जालना जिल्ह्यातील १० वारकरी शिक्षण संस्थांचे विद्यार्थी आणि शहरातील शाळांचे विद्यार्थी विविध वेशभूषा आणि देखाव्यासह सहभागी होणार आहेत. त्यानंतर सकाळी ११ वाजता संमेलनाचा उद्घाटन सोहळा होईल. यात उद्घाटक म्हणून मा. ह. भ. प. डॉ. नारायण महाराज जाधव (आळंदी देवांची) हे उपस्थित राहतील.अध्यक्षस्थानी संमेलन अध्यक्ष ह. भ. प. जगद्गुरू द्वाराचार्य डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर असतील. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचे सदस्य प्रा. दासू वैद्य आणि श्रीधर नांदेडकर, जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड व प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री उपस्थित राहणार आहेत.

**संमेलनातील प्रमुख सत्रे :**

पहिले सत्र (१३ डिसेंबर) दुपारी दोन वाजता संत साहित्यातील विश्वबंधुत्व या विषयावर परिसंवाद होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे निवृत्त विभाग प्रमुख प्रा. सतीश बडवे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सत्रात पंढरपूर येथील ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर, गुरुदेव सेवा आश्रम मोझरी येथील ह.भ.प. हरिभाऊ वेरुळकर , छत्रपती संभाजीनगर येथील संत साहित्याचे व्यासंगी अभ्यासक डॉ. दत्तात्रय डुंबरे, संत साहित्याचे व्यासंगी अभ्यासक बसवराज कोरे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील.

दुसऱ्या सत्रात दुपारी चार वाजता मानसिक स्वास्थ्य आणि संतविचार या विषयावर मुलाखत होईल. यात मा. ह. भ. प. डॉ. यशोधन महाराज साखरे (आळंदी देवांची) यांची मुलाखत डॉ. प्रमोद कुमावत आणि डॉ. ऋषिबाबा शिंदे घेतील. तिसऱ्या सत्रात सायं. ७ ते ९ या वेळेत हिमशिखा, पुणे प्रस्तुत कीर्तावणी हे संगीत नाट्य (वारी आडवाटेच्या विठोबाची...) सादर होईल. यात रुचिका खोत आणि स्वामिराज भिसे यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

रविवार (दि.१४) पहिल्या सत्रात सकाळी आठ वाजता सुपसिद्ध गायक दिनेश संन्यासी, प्रसाद चौधरी आणि डॉ. मोहिनी रायबागकर यांनी सादर केलेला अभंगवाणी हा कार्यक्रम होईल.

दुसरे सत्र: सकाळी दहा वाजता संवाद (टॉक शो) होईल. यात रिंगण, वारी आणि कीर्तावणी या विषयावर सचिन परब (संपादक, रिंगण मुंबई), संदेश भंडारे (सुप्रसिद्ध छायाचित्रकार, पुणे) व रुचिका खोत (प्रयोगशील नाट्यकलाकार, पुणे) हे सहभागी होतील. त्यांच्याशी विश्वाधार देशमुख संवाद साधणार आहेत.

संमेलनाचा समारोप सकाळी ११.३० वाजता होईल. यावेळी अध्यक्षस्थानी पुरुषोत्तम बगडिया राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून संमेलनाध्यक्ष डॉ. रामकृष्ण महाराज लहवितकर आणि ह.भ.प. प्रमोद महाराज जगताप (मुंबई) उपस्थित राहतील. या प्रसंगी वारकरी संप्रदायात योगदान दिल्याबद्दल ह.भ.प. भगवान महाराज आनंदगडकर, ह.भ.प. नानामहाराज पोखरीकर, ह.भ.प. सोनुने गुरुजी आणि ह.भ.प. अनिरुद्ध महाराज क्षीरसागर यांचा सत्कार केला जाणार आहे. संमेलनाची सांगता दुपारी २.०० ते ४.०० या वेळेत ह.भ.प. प्रमोद महाराज जगताप (मुंबई) यांच्या हरिकीर्तनाने होणार आहे.

या दोन दिवसीय संमेलनात जालनेकर नागरिकांनी, वारकरी सांप्रदायाच्या बांधवांनी व साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया सचिव श्रीनिवास भक्कड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, कार्यवाह डॉ. यशवंत सोनुने आणि संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ग्रेट फोटोग्राफर – मेजर रॉबर्ट गिल

ज्योतिर्मय साहित्य



डॉ. केनेथ डुकाडेल यांनी मंगळवारी २ डिसेंबर २०२५ रोजी अजिंठा लेण्यांना भेट दिली. तसेच वेरूळ (एलोरा) लेण्यांना त्यांनी बुधवारी ३ डिसेंबर २०२५ रोजी भेट दिली. यावेळी गुफा २० व २४ जवळील ठिकाणी रॉबर्ट गिल यांच्या छायाचित्रस्थळांना त्यांनी अभिवादन केले. डॉ. केनेथ यांचे नुकतेच २ महिन्यापूर्वी कॅथरीना सुईकेन्स यांच्याशी लग्न झाले आहे. हनिमून साठी हे जोडपे रॉबर्ट गिल यांचे पणतु असलेले डॉ. केनेथ यांनी भारताची निवड करून ते २० दिवसाचा दौरा करीत आहेत. मेजर रॉबर्ट गिल हे ब्रिटिश सैन्यातील अधिकारी, चित्रकार, पुरातत्व रसिक आणि नंतर छायाचित्रकार होते.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

डॉ. केनेथ डुकाडेल यांच्या वृत्तपत्रातील बातम्यांनी भारतीयांच्या इतिहासकालीन आठवणी जागा झाल्या. अजिंठा-वेरूळसह पश्चिम भारतातील गुंफा, मंदिरे आणि निसर्गदृष्यांचे चित्रण करून त्यांनी हा वारसा १९ व्या शतकात जगासमोर पोहचवला. विशेषतः अजिंठा लेणीतील भित्तीचित्रांची त्यांनी केलेली प्रतिकृती आणि नंतरचे फोटो यामुळे अजिंठा-वेरूळची ओळख युरोपमध्ये आणि पुढे संपूर्ण जगात पसरली. डॉ. केनेथ अजंठा-वेरुळच्या लेण्यामधील पेंटिग्ज पाहून थक्क झाले. आज येथे येणे सोपे आहे, पण त्या काळी आमचे पणजोबा येथे कसे आले असतील, कसे राहिले असतील असे प्रश्न त्यांना पडले. यावेळी गाइड भरत जोशी यांनी लेणीविषयी त्यांना माहिती दिली. आपल्या पणजोबांनी दिलेले योगदान ज्याची ऐतिहासिक नोंद आहे ते सर्व पाहण्यासाठी आलेल्या डॉ. केनेथ यांचे भारतीय संस्कृती, कुटुंबव्यवस्था जपणा-या सर्व भारतीयांना विशेष कौतुक वाटले. डॉ. केनेथ डुकाडेल हे मेजर रॉबर्ट गिल यांचे चतुर्थ परपोते (--) आहेत. जे ब्रसेल्स (बेल्जियम) येथे राहतात. डॉक्टर म्हणून व्यावसायिकता असलेल्या डॉ. केनेथ यांनी रॉबर्ट गिल यांच्या वारसा स्थळांना भेट देऊन भावनिक प्रतिक्रिया नोंदवल्या. बेल्जियम मधील निवास आणि आंतरराष्ट्रीय प्रवास करणारे डॉ. केनेथ या व्यक्तिमत्वाने अंजिठा भेटीतून भारतीय वारसा जतनतेबद्दल आपले मत व्यक्त केले. अजिंठा लेण्यांतील भित्तीचित्रे पाहून ''दुसऱ्या शतकातील भारतीय कला युरोपियन कलेइतकीच प्राचीन व प्रगत आहे'' असे ते म्हणाले. आपल्या पणजोबा रॉबर्ट गिल यांच्या जंगलातील राहणीवर आश्चर्य व्यक्त करीत असतानाच त्यांनी ''अजिंठा हे जागतिक चमत्कार असून ज्याचे संरक्षण भारतीय उत्कंठा व कौशल्याने करीत आहेत आणि भारतीय संस्कृतीच्या वारसा जपत माझे पूर्वज रॉबर्ट गिल यांच्याबद्दल आदर दाखवित आहात त्याबद्दल धन्यवाद'' असे भेटी पुस्तकात त्यांनी नमूद केले.

रॉबर्ट गिल यांचा जन्म १८०४ साली लंडनमध्ये झाला आणि तरुण वयात ते ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात दाखल झाले. कला क्षेत्रातील क्षमता ओळखून त्यांनी रॉयल एशियाटिक सोसायटी कडून मान्यता मिळवली आणि त्यांचा क्लासिफाईड आर्टिस्ट म्हणून उल्लेख होऊ लागला. १८४४ च्या सुमारास ईस्ट इंडिया कंपनीने अजंठा लेण्यांतील भित्तीचित्रे आणि शिल्पांची नोंद (ड्राईंग/कॉपी) करण्यासाठी त्यांची अधिकृत नियुक्ती केली. त्यांना सहाय्यक चित्रकार व स्थानिक कारागीरांची मदत देण्यात आली. १३ मे १८४५ पासून ते अजंठा परिसरात प्रत्यक्ष राहू लागले. दाट जंगल, भिल्ल आदिवासी, वाघुळ, मधमाशा अशा प्रतिकुल परिस्थितीतही त्यांनी लेण्यांतील चित्रांचे सूक्ष्म रेखाटन आणि रंगीत प्रतिकृती करण्याचे कठीण काम चालू ठेवले. पहिल्या भारतीय साथीदार पारो ज्या अजिंठा परिसरातील आदिवासी भूमी जमातीच्या होत्या त्यांची सोबत त्यांना स्फूर्ती, बळ देऊन गेली,ज्यामुळे एवढे मोठे कार्य त्यांना करता आले. १८४५ ते १८५६ पर्यंत रॉबर्ट गिल आणि पारो यांचे सहजीवन होते. पारोचा २३ मे १८५६ रोजी अजिंठा येथे मृत्यू झाला आणि रॉबर्ट गिल यांनी तिच्या स्मृती जतन होण्यासाठी अजिंठा ग्रामात (पोलीस ठाण्याजवळ) चबुतरा बांधून '' २३ १८५६ – '' असे कोरले. पारोला मुलबाळ नव्हते. डॉ.केनेथ डुकाटेल यांनी पारोच्या कबरेला अजिंठा ग्रामात २-३ डिसेंबर २०२५ ला भेट देऊन गिल-पारो प्रेमकथेच्या साक्षीदार स्थळाला अभिवादन केले आणि ''अजिंठा अशी जागा आहे की इथे वारंवार यावेसे वाटते; मी माझ्या सर्व कुटुंबाला इथे आणेन'' असे सांगितले. डॉ. केनेथ यांची भेट ऐतिहासिक क्षण असून ज्यामुळे गिल यांच्या वारसाला नवे जीवन मिळाले आहे. मेजर रॉबर्ट गिल यांना चित्रकामादरम्यान ११ वर्ष मार्गदर्शन करणारी आदिवासी स्त्री पारो एक मिसाल बनून राहिली आहे. या मार्गदर्शनामुळे पारो ही रॉबर्ट यांची प्रेमिका झाली आणि त्यांनी तिच्या मृत्यूपर्यंत दोघेही एकमेकाच्या भावनिक गुंतवणुकीने जगप्रसिद्ध झाले आहेत. रॉबर्ट गिल यांनी भित्तीचित्रे कॅनव्हासवर उतरविली आणि त्यामुळे लेण्यातील पेंटिंगचा जागतिक स्तरावर जो प्रसार झाला त्यामध्ये पारोचे योगदान महत्वाचे असल्याचे दिसून येते. **(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-११४



*रंगचक्रात जरी समावेश नसला तरी "सोनेरी रंग" हा रंगांच्या यादीतील एक प्रभावी रंग आहे. "चंदेरी, "सोनेरी", "कांस्य" असे धातूच्या नांवांचे रंग देखील समाविष्ट आहेत. 'गोल्डन' म्हणजे 'सोनेरी' रंग... हा रंग मौल्यवान धातू, सोन्याच्या नैसर्गिक पिवळ्या आणि चमकदार रंगांचे प्रतिनिधित्व करतो. हा रंग, यश, अमुल्यत्व, श्रीमंती, तेज, ऐश्वर्य,चमकदार रंगाचं, पावित्र्याचं प्रतीक मानला जातो. सूर्य, संपत्ती, आनंद आणि उच्च दर्जाचे प्रतीक म्हणूनही या रंगाचा उल्लेख आहे.*

*सोनेरी रंगाचे विविध प्रकार आहेत. पिवळे सोने, पांढरे सोने, गुलाबी सोने, काळे सोने अशा प्रकारांमध्ये सोनेरी रंग आढळतो. 'वास्तुशास्त्र पेंटींग' मध्ये 'चंदेरी' रंगा प्रमाणेच 'सोनेरी' हा रंग देखील क्वचितच वापरला जातो. हजारो कुंडलींच्या अभ्यासात एखादी कुंडली आणि वास्तुची कुंडली अशी मिळते की, त्या कुंडलीत 'सोनेरी' आणि 'चंदेरी' रंग वापरले जातात.*

*एखाद्या व्यक्तीचे वा घटनेचे वर्णन करतांना, 'सुवर्ण', 'सोनेरी' किंवा "गोल्डन" या शब्दांचा, विशेष नामाने उल्लेख केला जातो. "सुवर्ण क्षण", "सुवर्ण घटीका", 'सोनेरी दिवस' किंवा "गोल्डन चान्स" अशा शब्दांत वर्णन केले जाते. त्यामुळे भाषा सौंदर्य समृद्ध बनते. अगदी तसंच...! "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्येही जेव्हा ''सोनेरी रंग" वापरला जातो तेव्हा त्या पेंटिंगच्या सौंदर्यात भरच पडते. बघा ना...!! एखाद्या पेंटींग मध्ये 'सोनेरी रंग' वापरला जात नाही तरीही सहज त्या विषयाचे जाणकार सांगतात किंवा बोलतात कि,"सदर कलाकृतीचा 'गोल्डन पॉईंट' अमूक एक आहे. इतकं महत्व या सोनरी रंगाचं आहे. त्याचा उपयोग जरी झाला नाही तरी त्याच्या नांवाचा उपयोग, सोन्याचं अमुल्यत्व विचारात घेतलं जातं.*

*एकूणच हा रंग "आध्यात्मिक" "मौल्यवान", "एकमेव" अशा प्रकारच्या विशेषणांनी ओळखला जातो. या रंगाच्या आस्तित्वाने किंवा साध्या आठवणीने सुद्धा मनांवर आणि चेहऱ्यावर सकारात्मक प्रभाव पडलेला दिसतो.*

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या......

माहेराला जाता
झाल्या भावजया गोळा
चाले थट्टा-मस्करी
धाबे दणाणले सोळा || ३९१||

माहेराला मुक्काम
गठुडं गोठीच सुटलं
आज परत जायच,,
बोलता, तांबड फुटल ||३९२||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# त्याग आणि सेवेचा आदर्श : भगिनी निवेदिता




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

स्वामी विवेकानंदांचे नाव आणि कार्य आपल्याला सुपरिचित आहे. पण स्वामीजींची मानसकन्या भगिनी निवेदिता हिच्याविषयी मी जेव्हा वाचू लागलो तेव्हा तिचे कार्य बघून थक्क झालो. संतांचा किंवा थोर व्यक्तींचा सहवास परीसस्पर्शासारखा असतो. अशा व्यक्तींच्या सहवासात जेव्हा आपण येतो तेव्हा अंतर्बाह्य बदलून जातो. मार्गारेट एलिझाबेथ नोबल उर्फ भगिनी निवेदिता २८ जानेवारी १८९८ ला भारतात आली आणि स्वामीजींच्या सहवासात अंतर्बाह्य बदलून गेली. आपण इंग्रजाळलेली माणसे खूप पाहतो. पण ही मूळ इंग्रज असलेली स्त्री पूर्णपणे हिंदू झाली, भारतीय झाली त्याचे हे एकमेव उदाहरण असावे.




स्वामी विवेकानंदानी शिकागोच्या धर्मपरिषदेत हिंदू धर्मावर व्याख्यान दिले आणि त्यांच्या नावाची चर्चा सर्वत्र होऊ लागली. त्यांच्या अमेरिकेतील व्याख्यानांची मालिका संपल्यावर स्वामीजी इंग्लंडला आले. लंडनला त्यांच्या व्याख्यानांचे आयोजन केले गेले होते. तेथे मार्गारेट जाऊ लागली. आणि स्वामीजींच्या विचारांनी ती प्रभावित झाली. एक दार्शनिक म्हणून, सद्गुरू म्हणून ती स्वामीजींकडे पाहू लागली. ती त्यावेळी तेथे एक शिक्षिका म्हणून मनापासून काम करीत होती. माणसाचे चारित्र्य घडवणारे शिक्षण स्वामीजींना अपेक्षित होते. त्यासाठी निष्ठेने काम करू शकणाऱ्या व्यक्तींची त्यांना गरज होती. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देऊन मार्गारेटने त्यांच्या कार्यात सहभागी होण्याची तयारी दाखवली.

आणि ती सगळे सोडून भारतात आली. स्वामीजींनी तिला सांगितले होते की युरोपियन व्यक्तीला भारतात काम करायचे असेल तर त्याने पूर्ण हिंदू झाले पाहिजे. हिंदू चालीरीती, पद्धती समजून स्वीकारल्या पाहिजेत. मार्गारेटने या सर्व गोष्टी स्वेच्छेने स्वीकारल्या आणि एका संन्यासिनी प्रमाणे ती कोलकात्याला शारदा मातांच्या आश्रमात राहू लागली. शारदा मातांच्या दर्शनाला ज्या स्त्रिया येत त्यावरून स्त्रियांच्या भारतातील दारूण परिस्थितीची तिला कल्पना आली. तिची स्मरणशक्ती अलौकिक होती. हिंदू समाजातील लोकांनीही तिला आपले म्हणावे म्हणून स्वामीजी तिला सर्वत्र आपल्याबरोबर नेत. तिच्याशी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करीत. कोलकात्याच्या रामकृष्ण आश्रमात सेवाभावी व्रत स्वीकारून मार्गारेटने आपले सर्वस्व परमेश्वरचरणी, गुरुचरणी अर्पण केले होते. त्यावेळी आपले सर्वस्व निवेदित केलेल्या त्या कन्येला स्वामीजींनी नवीन नावाने हाक मारली ' निवेदिता ' आणि मार्गारेट नोबेल भगिनी निवेदिता झाली.

(क्रमशः)



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# द्रुष्यनिरसन

ज्योतिर्मय साहित्य

आपण समासाच्या समारोपाकडे आलो आहोत. आता पर्यन्त आपण अभ्यासले की डोळ्याला जे जे दिसते ते ते सगळे खरे असतेच असे नाही। त्यासाठी समर्थानी आरशाची जादुगाराची ,पाण्याच्या बुडबुड्याची अशी कितीतरी ऊदा दिली आहेत. आणि ती तंतोतंत खरी आहेत.

माया खरी मानावी म्हटले तर ती प्रत्यक्ष नाश पावते. माया खोटी मानावी तर ती प्रत्यक्ष दिसते. म्हणून माया खरी आहे असे सांगितले तर मन विश्वास ठेवत नाही. तसेच माया खोटी आहे असे सांगितले तरीही मन विश्वास ठेवायला तयार होत नाही. म्हणजेच मायेचा विचार म्हणजे खोट्याचा विचार आहे. आणि मायेचा हा जो काही पसारा आहे तो स्वप्नासारखा आहे असे समजा. माणसाच्या विचारामध्ये ही जीगुंतागुंत होते याचे कारण म्हणजे अविद्या होय. अविद्येतुन ''मी देहचं आहे'' ही देहबुद्धी म्हणजेच अहंकार जन्माला येतो. या अहंकारी स्वभावामुळे परमेश्वरा पर्यन्त पोहचता येत नाही. कारण देवाला सत्वगुणी लोकचं आवडतात. आपला जन्म अविद्येतच होतो. आतबाहेर सगळीकडे द्रुष्याचा मायावी पसारा येवढा वाढला आहे की मिथ्या असलेले द्र्युष्य

सत्यच आहे असा अविवेक किंवा चुकीचा विचार आपल्या मनामध्ये येतो. द्रुष्याच्या बाजूने देह खरा मानला व द्रुष्याच्या बाजूने दिसणारे पदार्थ खरे मानले.अशा वेळीद्रष्टा व द्रुष्य यांच्यामधे वेगळेपणा निर्माण होतो.आणि एकमेकांच्या बद्दल संशय निर्माण होतो.परमात्म स्वरूप सुक्ष्म असल्याने त्याच्या पर्यन्त पोहचायचे आहे तर आपले आत्मज्ञान वाढवले पाहिजे. आत्मज्ञानाच्या क्षेत्रामध्ये आपण द्रुष्याला सत्य मानतो. मी पणाने ब्रम्हप्राप्ति होईल हे शक्य नाही. द्रुष्यावर खरे पणाचा विश्वास असणे हे तर खरे देहबुद्धी वक्षण आहे.आपल्या इंद्रियांना जे जे दिसते व आपल्या इंद्रियांना पटते त्याचा स्विकार करावा.खोट्या मिथ्या गोष्टींचा त्याग करावा.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ
समास आठवा समाप्त

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।



# || कृष्णतत्व ||

सौ उज्वला धर्माधिकारी
पुणे

ज्योतिर्मय साहित्य

पाथरवट दगडाला देवपण देतो मंदिरात प्रतिष्ठापना करतात व ज्या मंदिरात जो कायम स्वरूपी विराजमान आहे तो मूळबीज म्हणजे ॐ कार तोहि मीच होय.

ज्या ॐ काराच्या पोटी अ, उ व मकार (अकार उकार मकार) अशी अक्षरे उत्पन्न होतात व जी उपजल्यावर तीन वेद उत्पन्न झाले. म्हणून ऋक, यजु व साम हे तिन्ही वेदहि मीचं++++

वेदांची वेद परंपरा मीचं !!!

कर्माचे फल मी आहे.

कर्मफळ देऊन पोषण करणारा मी.

सर्वांचा स्वामी मी.+++

प्राण्यांनी केलेले पुण्य --पाप पहाणारा मी.

सर्व प्राण्यांचे निवासस्थानी मी++++!!! कर्म करणारा, करवून घेणारा ज्ञाता मी !!

नित्यानंद देणारा मी ++

उलट उपकाराची अपेक्षा न करता उपकार करणारा मी आहे.

रोगदिकांच्या योगाने आर्त होऊन शरण आलेल्या भक्तांचीआर्ति -पिडा वाहिनी करणारा मीच आहे.

जगाचा उत्पादक, जगाचा संसार करणारा

जगाची स्थिती करणारा, कर्मफलांचा निधि,

जगाचें अक्षय बीज मी आहे.

संपूर्ण विश्वातील चल अचल, स्थावर जंगम, या विश्वातील प्रकृतीच्या अधेमधे,खालीवर,जे जे शाश्वत आहे आणि जे जे सत्य आहे. तिथे माझा वास असेल. ज्याच्या मुळे ही प्रकृति वाचते, ज्याच्या आश्रयाने विश्व प्रसवते व जो प्रकृतीच्या स्वाधीन होऊन सत्व,रज,तम या गुणांचा उपभोग घेतो.

संपूर्ण जगावर राज्य करणारी मातामहालक्ष्मी संसारार्णवतारिणी, जगदानंददायिनि महालक्ष्मीचा मी पती आहे.

आकाशाने क्षितिजापर्यंत आपले स्थान अढळ ठेवावे, वायुने क्षणभर देखिल स्वस्थ बसू नये.

अग्निने जाळावे. मेघाने वृष्टी करावी.

पर्वतांनी आपल्या जागा सोडू नयेत.

समुद्राने आपल्या मर्यादा ओलांडू नये.

पृथ्वीने सर्व भूतांचा भार वहावा.

ही सर्व त्या जगदानंदाची आज्ञा आहे असे समजावे.

पहाटे कोंबडा बांग देतो. तेव्हा शेतकरी राजा आपल्या दिवसाची सुरुवात करतो.आपण सर्वसामान्य जनता पण त्याचवेळी पहाटे उठते. परब्रम्हाच्या आज्ञेने आपला दिवस सुरू होतो.

तसेच सुर्यनारायणाचे आहे तो काही प्रकृतीच्या वेगवेगळ्या गुणांनी युक्त असलेल्या मी पणाने एक असून अनेक पणाने जगातील प्राणीमात्रं प्राणरूपाने जिवंत असतो. तेव्हा त्या सुर्यनारायणा जवळ कोणताही भेद नसतो. मग माणसंच खोट्या प्रतिष्ठेच्या अहंकाराच्या डबक्यात साठून का बरं रहातात! असा मला बाळबोध प्रश्न पडतो.

गरिबश्रीमंत, सुंदर कुरूप, आजकाल तर जातीजातीत जे बिनडोकी स्तोम माजवले जात आहे. त्यांनी तर समाजमन दुभंगले जात आहे. यासाठी कृष्ण तत्वांची ओळख करणे गरजेचे आहे. सुर्याची स्थिती पाहिली चंद्राचे योगदान पहाणे महत्वाचे आहे ना+++ (क्रमशः)

# || समृद्ध मराठवाडा ||

माधव सूर्यवंशी,
माकणीकर
(मो. 9527853953)



ज्योतिर्मय साहित्य

भगवान शिवाच्या बारा ज्योतीर्लिंगापैकी ०३ ज्योतीर्लिंग मराठवाडयात आहेत. म्हणतात की भगवान विष्णु आणि शिव यांच्यातील श्रेष्ठत्वाच्या वादातून भगवान शिव प्रकाश स्तंभाच्या रुपात प्रगट झाले त्यातून ज्योतिर्लिंगाची स्थापना झाली. या ज्योतिर्लिंगाची स्थापना एकाच वेळी झाली नाही. त्यासाठी वेगवेगळे प्रसंग आणि कथा आहेत. परंतु वेरुळ येथील श्री घृष्णेश्वर मंदिर, औंढा नागनाथ येथील नागेश्वर मंदिर, परळी येथील वैजनाथ मंदिर असे तीन ज्यातिर्लिंग मराठवाडयाच्या भूमीमध्ये आहेत.

भारतात एकूण ५१ शक्तीपीठे आहेत. पौराणिक कथेनुसार माता सती ही भगवान शिवाची पहिली पत्नी होती. त्यांचे वडील राजा प्रजापतीच्या यज्ञाच्या वेळी भगवान शिवाला सन्मान न मिळाल्याने सतीने अग्नीत उडी घेऊन प्राणाचा त्याग केला. क्रोधीत शंकराने ते शरीर खांदयावर घेऊन क्रोधाने विनाश सुरु केला. देवादिकांच्या विनंतीनुसार भगवान विष्णुने सुदर्शन चक्राने शरीराचे ५१ तुकडे केले व ते तुकडे ज्या ज्या ठिकाणी पडले तिथे शक्तीपीठे तयार झाली अशी आख्यायिका आहे. महाराष्ट्रामध्ये साडेतीन शक्तीपीठे आहेत ती अशी कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची भवानीमाता, माहुरची रेणुकामाता हे तीन पूर्ण शक्तीपिठे आहेत आणि सप्तशृंगी गडावरील सप्तशृंगीमाता हे अर्धे शक्तीपीठ मानले जाते. त्यातील मराठवाडयात तुळजापूर आणि माहूर हे दोन पूर्ण शक्तीपीठे आहेत.

मराठवाडयात गुप्त, राष्ट्रकुट, सातवाहन आणि वाकाटक साम्राज्यामध्ये वेगवेगळया धार्मिक विचारसरणीचे लोक एकत्र नांदत होते हे अजिंठा आणि वेरुळ येथील लेण्यांवरुन दिसून येते. हिंदु, जैन आणि बौध्द लेण्या कोरल्या गेल्या. मराठवाडयात अजिंठा, वेरुळ, (छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), पितळखोरा व खरोसा येथील लेण्या त्या कार्यकाळाच्या समृध्दीच्या साक्ष देतात.

नद्या वाहतात म्हणजे त्या केवळ वाहतात असे नाही. मानावाच्या जीवनामध्ये पिण्याच्या पाण्याचा, जलसिंचनाचा आणि उपजिविकेच्या त्या मुख्य स्त्रोत असतात. मानवी संस्कृतीचा इतिहास नदीकाठावर विकसीत झाला. त्यामुळे त्या संस्कृती जोपासण्याचे काम करतात. धार्मिक मान्यतेनुसार नदीला पवित्र मानले गेले आहे. त्यामुळे माणसांने आपले चारित्र्य पवित्र ठेवावे यासाठी नदयांचीच उपमा दिली जाते. त्यामुळे नदया या माणसांच्या जीवनाला आधार देतात. भारतातील धार्मिक मान्यता असलेल्या ज्या प्रमुख्या नदया आहेत त्यातील गोदावरी मराठवाडयातून वाहते. (क्रमशः)



## आरोग्य संजीवनी

# दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

ज्योतिर्मय साहित्य

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

खुप काम आहे, असे म्हणत अनेकजण जेवण टाळतात. परंतु आरोग्यासाठी हे अतिशय घातक ठरू शकते. यामुळे शरीरात विविध प्रकारचे आजार निर्माण होऊ शकता तसेच कार्यक्षमतेवर देखील वाईट परिणाम होऊ शकतो काही व्यक्ती वजन कमी करण्यासाठी जेवण टाळात पण आरोग्यासाठी हे घातक आहे. हे आहेत दुष्परिणाम.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

चक्कर येणे.

भुकेले राहिल्याने अशक्तपणा येऊन अनेकदा भोवळ येते.

ताण-तणाव.

भुकेल्या अवस्थेत शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोन्समध्ये वाढ होते. यामुळे तणाव जाणवतो.

लठ्ठपणा वाढतो.

भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केल्यास, वेळी-अवेळी खाल्लास, वजन वाढते, म्हणजे लठ्ठपणा वाढतो... वेळेत जेवण न केल्याने चयापचय प्रक्रिया बिघडते व फॅट्स शरीरात जमा होतात, यामुळे वजन वाढण्यास सुरुवात होते. तेव्हा वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तरं, भूक लागेल तेव्हा वेळेवर योग्य-पौष्टिक आहार घ्या आणि किमान २० मिनिटे व्यायाम करा...

मेंदूचे कार्य बिघडते.

ग्लुकोजच्या मदतीने मेंदूचे कार्य सुरू असते. यासाठी योग्य प्रमाणात आणि वेळेत जेवण करा. अन्यथा रक्तातील साखरेची पातळी खालावते. लक्ष केंद्रीत करण्याची क्षमता कमी होते.

चिडचिड.

भुकेमुळे जास्त चिडचिड होते. रक्तातील साखरेची पातळी खालावल्याने मेंदूप्रमाणे तुमच्या मूडवर याचा परिणाम होतो...

***

# श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालयातील ६७ विद्यार्थ्यांची औरंगाबाद ऑटो अँसिलरी लिमिटेडमध्ये निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीतर्फे अलीकडेच औरंगाबाद ऑटो अॅन्सिलरी प्रा. लि. या नामांकित कंपनीची कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्यात आला होता. या ड्राइव्हमध्ये बी.टेक. मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स शाखेतील एकूण ६७ विद्यार्थ्यांची ट्रेनी इंजिनिअर म्हणून निवड झाली आहे. याव्यतिरिक्त, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातील पाच विद्यार्थ्यांची व्हॅलिओ लिमिटेड, पुणे या ख्यातनाम कंपनीत ट्रेनी इंजिनिअर पदासाठी




निवड झाली आहे.

श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्चच्या प्रियांका काळे आणि रुतुजा बोरसे यांची बॉम्बे हायकोर्टातील न्यायाधीश यांच्या पर्सनल असिस्टंट पदासाठी, लेखी परीक्षा, संवाद कौशल्य, टायपिंग चाचणी आणि मुलाखत यांच्या कठोर प्रक्रियेतून निवड झाली आहे. त्यांना महाविद्यालयाच्या करिअर कॉउंसेलिंग विभागाचे मार्गदर्शन लाभले.

तसेच श्रीयश इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्चच्या मार्केटिंग विभागातील अजिंक्य मैंद आणि प्रेम पाटोळे यांची जर्मन मल्टिनॅशनल कंपनी टीयूव्ही हें नलँडमध्ये टेरिटरी मॅनेजर म्हणून निवड झाली आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. बसवराज मंगरूळे यांनी प्राचार्य, ट्रैनिंग अँड प्लेसमेंट विभाग आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# बी.एम.सी.सी. पुणे आणि हेरिटेज कलेक्टिवतर्फे डॉ. चन्द्रहास शास्त्री यांचे व्याख्यान संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** ''भारतीय ज्ञानाचे वैभव'' या प्रेरणादायी विषयावर भारतीय ज्ञान प्रणाली तज्ज्ञ डॉ. चन्द्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे विशेष व्याख्यान आज बृहन्महाराष्ट्र कॉमर्स महाविद्यालय, पुणे आणि हेरिटेज कलेक्टिव यांच्या संयुक्त विद्यमाने अत्यंत उत्साहात संपन्न झाले.

आज दिनांक ११ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता पार पडलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग आणि भारतीय संस्कृती, इतिहास व तत्त्वज्ञानात रस असलेल्या अनेकांनी उपस्थिती लावली.

कार्यक्रम ऑफलाइन पद्धतीने घेतण्यात आला असून, मराठी आणि इंग्रजी या दोन्ही माध्यमांतील सादरीकरणामुळे सर्वांसाठी समजण्यास सोपा व समृद्ध अनुभव निर्माण झाला.

व्याख्यानात डॉ. शास्त्री यांनी भारतीय ज्ञान परंपरेची गहराई, तिची वैशिष्ट्ये, आधुनिक शिक्षणातील तिचे महत्त्व आणि नव्या पिढीसमोर उभ्या असलेल्या संधी यावर प्रभावी भाष्य केले. तसेच वेदमूर्ती देवव्रत रेखे यांच्या कार्याचा उल्लेख करत प्राचीन ज्ञानसंस्कृतीची आधुनिक संदर्भातील उपयुक्तता अधोरेखित केली.

श्रोत्यांनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, युवावर्गामध्ये भारतीय संस्कृतीबद्दलची जाण, अभिमान आणि अभ्यासाची प्रेरणा निश्चितच वाढेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कौतुकास्पद पद्धतीने पार पडले असून,




उपस्थितांनी अशा कार्यक्रमांची संख्या वाढवण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# वाचताय ना ? वाचलंच पाहिजे !

**ज्योतिर्मय साहित्य**

आजच्या धावपळीच्या, तणावग्रस्त आणि वेगाने बदलणाऱ्या युगात एक प्रश्न नेहमी मनात येतो आपण खरोखर वाचतोय का? फक्त मोबाईलवरील स्क्रोलिंग, सोशल मीडियावरील पोस्ट्स आणि क्षणाक्षणाला येणाऱ्या नोटिफिकेशन्स यालाच आपण 'वाचन' म्हणतो का? आपण माहितीच्या महासागरात तरंगत आहोत? पण चिंतनाच्या खोलीचं काय? म्हणूनच विचारावसं वाटतंवाचताय ना? वाचलंच पाहिजे !

वाचन ही केवळ एक सवय नसून मानसिक शिस्त आहे. आपलं मन जेव्हा शब्दांशी भेटतं, तेव्हा विचारांना आकार येतो, कल्पनाशक्ती विस्तारते आणि आत्मविश्वास बळकट होतो. एखादं चांगलं पुस्तक म्हणजे शांतपणे दिलेला जीवनाचा उपदेश असतोअडचणींमध्ये कोणत्याही दिखाव्याशिवाय, आपुलकीने केला जाणारा संवाद. म्हणूनच म्हणतात, जेथे पुस्तक, तेथे प्रकाश.

आज एक मोठा बदल दिसतो दीर्घ, चिंतनशील लेख वाचायला कमी आवडतात; तत्काळ माहिती देणारी छोटी व्हिडिओज, रील्स किंवा सारांश एवढंच पुरेसं वाटतं. पण ज्ञानाचा पाया इतका उथळ ठेवला तर विचारशक्ती कशी वाढेल? अभ्यास असो, व्यवसाय असो किंवा जीवनातील नातेसंबंध असोतसखोल समज, निरीक्षण आणि समतोलपणा केवळ वाचनातूनच येतो.

वाचनाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्व-शोध. जेव्हा आपण एखादं आत्मचरित्र वाचतो, तेव्हा त्या व्यक्तीच्या संघर्षांतून आपल्याला स्वतःचे प्रश्न समजतात. जेव्हा आपण एखादा कादंबरीतील पात्राचा वेदना अनुभवतो, तेव्हा आपलं मन अधिक संवेदनशील होतं. जेव्हा एखादा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ हातात घेतो, तेव्हा आपल्था जीवन-मूल्यांना नवी दिशा मिळते.

ज्यांना वाचनाची सवय नाही, त्यांनी सोप्या भाषेतील कथा, निबंध किंवा प्रेरणादायी मराठी साहित्यापासून सुरुवात करावी. हळूहळू अधिक गंभीर आणि सखोल पुस्तकांकडे वळावं. कुठलंही पुस्तक वाया जात नाहीकधी कथेतून मानवता शिकायला मिळते, कधी



कवितेतून संवेदना, कधी इतिहासातून धडे, तर कधी तत्त्वज्ञानातून दिशा.

आजच्या मुलांना आणि तरुणांना वाचनाची सवय लावणे ही आई-वडील, शिक्षक आणि समाजाची मोठी जबाबदारी आहे. कारण वाचनाची सवय म्हणजे केवळ गुण मिळवण्याचं साधन नाही ती व्यक्तिमत्त्व घडवण्याची भक्कम पायरी आहे. प्रामाणिक, संवेदनशील, विचारशील आणि विवेकपूर्ण नागरिक घडवण्यासाठी वाचनाची संस्कृती अत्यावश्यक आहे.


विद्यावाचस्पती
चन्द्रहास दुर्गादासशास्त्री सोनपेठकर

शेवटी, वाचन हे एकांतातील मित्र आहे, मनःशांती देणारी साधना आहे आणि प्रगतीचा मार्ग आहे. आपल्या व्यस्त जीवनात वाचनासाठी वेळ काढणं म्हणजे स्वतःसाठी वेळ काढणं. म्हणून पुन्हा एकदा सांगावंसं वाटतं

वाचताय ना? वाचलंच पाहिजे!

कारण शब्द वाचले जातात, विचार घडवतात, आणि विचारच आपल्या जीवनाचा भविष्यकाळ घडवतात.

(शांतता, पुणेकर वाचत आहेत! उपक्रमानिमित्त विशेष लेख.)




# गुरु वायूर येथील श्रीकृष्ण मंदिर

**ज्योतिर्मय साहित्य**

केरळ मधील पुरातन प्रसिद्ध मंदिराचा अभ्यास करताना, आज आपण गुरुवायूर येथील श्रीकृष्ण मंदिराला भेट देणार आहोत.



गुरुवायूर हे केरळमधील त्रिशूर जिल्ह्यातील एक प्रसिद्ध ठिकाण आहे. हे त्रिशूर पासून केवळ २८ किलोमीटर दूर आहे. तसेच हे कोची या नजीकच्या विमानतळापासून ८० किलोमीटर अंतरावर आहे. हे मंदिर ५००० वर्ष जुने असावे,असे मानण्यात येते. तथापी याचा उल्लेख दहाव्या शतकापासून साहित्यात आढळतो.

या मंदिराला *भूलोकीचे वैकुंठ* किंवा *दक्षिण द्वारका* म्हणूनही संबोधण्यात येते. या मंदिरात श्रीकृष्णाच्या चतुर्भुज बाल रूपाची पूजा केली जाते. भगवंताच्या हातात शंख,चक्र कमळ व गदा आहेत. या मंदिराला भगवंताचे पृथ्वीवरील निवासस्थान मानण्यात येते. यामुळेच या स्थानाचे महत्त्व अनन्य साधारण असे आहे. हा विग्रह अष्ट धातूंचा आहे. *येथील श्रीकृष्णास गुरुवायुरप्पन या नावाने पूजले जाते*

कृष्ण मंदिराच्या उत्तरेला एक पवित्र तीर्थ आहे ते रुद्र तीर्थ या नावाने विख्यात आहे.हे तीर्थ इतके पवित्र आहे की, या तीर्थात प्रत्यक्ष भगवान महादेवांनी आणि पार्वती मातेने स्नान केल्याचे सांगण्यात येते. यावरूनच या तीर्थाला रुद्र तीर्थ हे नाव पडले. या रुद्र तीर्थाच्या निकट ममीयूर शिवमंदिर आहे तेथे शिव व पार्वती यांची मंदिरे आहेत.

श्रीकृष्ण मंदिरातच अय्यप्पाचे एक उप मंदिर सुद्धा आहे.

**मंदिराच्या स्थापने मागील कथानक**

भगवान श्रीकृष्णाच्या गोलोक धामाला गमन केल्यानंतर, द्वारका पाण्यात बुडाली. या द्वारकेतच भगवान श्रीकृष्णाची बाल रूपातील ही प्रतिमा ज्याची नित्य पूजा होत असे, तीही जलमग्न होऊन समुद्राच्या तळाशी गेली.

भगवान श्रीकृष्णाच्या आज्ञेने उद्धवांनी देव गुरु बृहस्पती व वायू देव यांच्या मदतीने तो विग्रह समुद्रातून काढून घेतला. भगवंतांनी उद्धवाला असे सांगितले होते की, शिव पार्वतीच्या आज्ञेने तो विग्रह पवित्र जागी स्थापित करावा. अशा जागेचा शोध घेत घेत बृहस्पती गुरु आणि वायु यांनी हा विग्रह सध्या जिथे मंदिर आहे तिथे आणला. सर्वप्रथम भगवान शिव आणि पार्वती यांनी या विग्रहाची मनोभावे पूजा केली. आणि गुरु व वायू यांना हा विग्रह इथेच स्थापन करण्याची आज्ञा केली. त्यानंतर येथे भव्य मंदिर उभारले गेले.

(क्रमशः)















# तथापि - दासू वैद्य यांची काव्य दादागिरी अर्थात दासूगिरी

**ज्योतिर्मय साहित्य**

लोकप्रिय कवी दासू वैद्य यांचा तथापि नावाचा नवा काव्य संग्रह काल घरपोच मिळाला, आणि तो पॅक लिफाफा फोडताच सुंदर मुखपृष्ठ पाहून सहज मुखातून शब्द निघाला, वाह

काही साहित्यिक खरंच किती विलक्षण असतात? त्यांचं साहित्य विलक्षण सुंदर वाचनीय अर्थपूर्ण, भावनांना स्पर्श करणारं, हृदयाला हात घालणारं असंच असतं आणि यात माझ्या दासू या मित्राची मी तरी दादागिरी म्हणेन, आणि हळूच दादागिरी शब्द दासू सारख्या हळव्या मनाच्या मित्राला लागू पडणार नाही म्हणून मी दासूगिरी म्हणेन. इतका सुंदर आहे हा तथापि काव्यसंग्रह.

उजळण्या मागचं जळणं आणि जगणं सांगणारा हा काव्य संग्रह वाचून समजून घेतला की अथ पासून अंता पर्यंत वाचक फिरून येतो.

तथापि या काव्यसंग्रहात दासू यांच्या ५८ एकापेक्षा एक कविता आहेत. कविता म्हणजे जगणं हेच दासू यांच्या कवितेचा गाभा आहे.

त्यांच्या या संग्रहातील एक से एक ५८ कवितापैकी माझ्या मनाला ज्या स्पर्शून गेल्या, माझ्याशी बोलत्या झाल्या, त्या कविता म्हणजे पैंजण, लोणचं, मायबाप खोडरबर, मेल्या आईचं लेकरू तसेच मांजर, कधी भात चिक्की बाई चिक्की,

बेपत्ता, पूर्वी, अवेळी, सायकल, तवंग, तरीही, भिजलेली ओळ, विवस्त्र हट्टी डाग, सुखरुप, कुजबुज. होड्या, झोप, गवत झुल झुल झेंडा झुल, दुःख घामासारखं, आणि शेवटची कविता मागणं या होत त्यापैकी काहींवर मी लिहित आहे.

हे पुस्तक हातात घेतलं आणि पूर्ण वाचून, समजून घेतल्याशिवाय माझ्यासारख्या अकाऊंट ऑफिसर म्हणून सेवेत रुक्ष आकड्यांशी खेळलेल्या व्यक्तीला शब्दांशी कसे खेळता येईल? तरी हा छोटा प्रयत्न करतो आहे. माझी चूक माझा मित्र दासू माफ करेल याची मला शंभर टक्के खात्री आहे.

खरं तर उजळण्यामागचं जळणं समजून घेताना कवी दासू वैद्य लिहितात,

अव्यक्तातलं शब्दात पकडणं, हा चमत्कार नसला तरी साधना मात्र आहे. मुळात व्यक्त व्हावं वाटणं हा माणसाचा स्थायीभाव आहे. दासू येथे म्हणतात, कवी जेंव्हा लिहित नसतो तेंव्हाच लिहित असतो. आणि प्रत्यक्षात लिहित असतो तेंव्हा फक्त कागदावर उतरवत असतो, द्रवरूप मानसिकतेतून

मन कायम गर्भार असतं. त्यामुळे ज्या दिवसाच्या झोळीत कवितेचं दान पडतं, तो दिवस विशेषच.

असे लिहित दासू वैद्य यांनी आपला तथापि हा कविता संग्रह, कविता न सुचलेल्या दिवसांना अर्पित केला आहे.

आणि या कविता तुम्हा सर्वांच्या आहेत, हे ही सांगण्यास ते विसरले नाहीत.

दासू यांनी काव्यसंग्रहाच्या सुरवातीलाच संत नामदेवाचा खालील अभंग दिला आहे.

प्रेमपिसे भरले अंगी
गीते छंदे नाचू रंगी
कोण वेळ काय गाणे
हे तो भगवंता मी नेणे
वारा धावे भलतेया
तशी माझी रंग छाया
टाळ मृदुंग दक्षिणेकडे
आम्ही गातो पश्चिमेकडे
बोल बाळक बोबडे
तरी ते जननीये आवडे

अर्थात श्रेष्ठ संत नामदेव जेंव्हा स्वतःच्या काव्य लेखन निर्मितीबद्दल बालकपण पत्करतात, तेथे आपण कुणी ज्येष्ठ श्रेष्ठ कवी नाही असे दासू यांना सांगायचे असेल.

तथापि या आपल्या काव्य संग्रहातील पहिल्याच पैजण या कवितेत ते लिहितात,

कित्येकांनी
जिंदगी ठेवली गिरवी
तेंव्हा आले या दगडांना
या घोटीव आकार
स्वतःला खोदल्यासारखं
खणली माती
तेंव्हा जमिनीत लपलेलं पाणी
झालं उजागर

अर्थात कुठलीही नवनिर्मिती ही कोणाच्या तरी कष्टाने, त्यागाने उभी झालेली असते

हे सांगण्याचा कवीचा हा अदभुत प्रयत्न आहे.

वेरूळ येथील लेण्यातील मूर्तिकला त्या मूर्तिकारांच्या जिंदगी गिरवी ठेवण्याचा

अविष्कार आहे, अश्या विविध नवनिर्मितीची जाणीव कवी मनालाच होऊ शकते.

दुसऱ्या कवितेचे नाव. लोणचं असं आहे. या कवितेत कवीने एखादं लोकगीत उदा.



किस बाई किस दोडका किस
दोडका किस
दोडक्याची फोड लागली गोड
आणिक किस बाई आणिक किस
या सारखी कविता
लोणचं घाला बाई
लोणचं घाला
कशाचं कशाचं?
स्वतःचं?
नाही नाही आंब्याचं

या सारखी सुंदर अर्थपूर्ण कवितेत स्त्री पुरुष असमानतेचे चिंतन मांडले आहे.

मला तथापि या काव्य संग्रहातील सर्वात जास्त आवडलेली कविता म्हणजे खोडरबर होय.

कवी लिहितात,

ज्यांच्याजवळ आहे खोडरबर
त्यांनी खुशाल चालवावी
बेभान पेन्सिल पुढातल्या
कागदावर
कोऱ्या कागदाला ठेवून साक्षी
कराव्यात असंख्य चुका
पेन्सिलचं टोक झिजू देत
डोई वरचा दिवा विझू देत
मात्र धावू देत दुडू दुडू अक्षरं
मनमौजी अंगणात
वाह मित्रा?

माझ्या सारखा पामर यावर काय लिहिल?

जीवनाच्या तालावर नाचताना पायाला जखमा झाल्या तरी पुन्हा नव्याने नाचले पाहिजेच, या अर्थाने जीवन शिकवणारी आहे ही खोडरबर ही कविता.

मी किती आणि काय काय लिहू? असे झाले आहे.

शब्दांनी, अर्थानी,भावनांनी, ओतप्रोत भरून पावलेला तथापि हा काव्य संग्रह

कुणी घेतला नाही, वाचला नाही तर हे जगणं म्हणजे काय? हे इतक्या तळमळीने कोण सांगेल बरं?

यातील मेल्या आईचं लेकरू या कवितेत कवी एके ठिकाणी म्हणतात,

वट भरण्याच्या रात्री
पोरगा घराचा रस्ता विसरावा
नि हळदीनं चमकणारी पोरगी
वाट पाहताना थकून झोपी
जावी
या पेक्षा वेगळं काय झालंय
इथं पेरलेल्या जमिनीचं

हे वाचताना मी कधी गहिवरलो हे कळले नाही, अश्रूंचे थेंब गालावर ओघळले, तेंव्हा भानावर आलो.

इतकं कवीने काळ्या आई बद्दल आस्था दाखवत अवसान घातकी आभाळा बद्दल लिहिलं

आहे. हे सगळं येथे लिहिणं खरंच अवघड आहे.

मित्रा दासू
तुझ्या काव्य प्रतिभेला प्रणाम.

तहान या कवितेतील एका कडव्यात कवी लिहितात,

तहान शेंदते तहान नांदते
पोहऱ्याला दिवस बांधते
घागर लवकर भरेना
पोहरा काही थांबेना

शेवटी ती बाई जाते तेंव्हा कवी रडवतात म्हणतात

गेली गेली बाई
तहान सोबत घेऊन गेली
तहान मागे ठेवून गेली

बाप रे किती हे भावपूर्ण? मनाला विचारात

गुंतवणारे लिखाण? आणि परिस्थितीचे शब्दांकन

बाई या कवितेतील एका कडव्यात कवी लिहितात

नजरांचा ताप
देह झाला शाप
कपड्यात बाई
भेगाळली

सावकारी समाजव्यवस्थेवर एक जबरदस्त प्रहार करत कवीने येथे विलक्षण प्रतिभेचे दर्शन घडविले आहे.

तसेच तवंग या कवितेतील एका कडव्यात कवी लिहितात

वाहत्या गंगेत
हात धुवून घेण्याची आहेच प्रथा
मग प्रेतं वाहत आली तर
बिघडलं कुठं

आणि जेंव्हा महामारीच्या प्रक्षोभानं गाठलं तेंव्हा

स्वतः प्रेत वाहून नेणाऱ्या गंगामैयाच्या चमत्काराचीही चढेल एक तवंग गंगेच्या पाण्यावर



*गिरीश वसेकर ( देशपांडे)*
*नांदेड सिटी, पुणे ९४२२६५९४००*

हे वाचून मानवी प्रवृती व निसर्गाचे रौद्र रूप यावर कवीने शेवटी व्यक्त केले

आहे की,

गंगा वाहतच राहील
काळाच्या पात्रातून

तथापि याच काव्य संग्रहातील एक कविता आहे, भिजलेली ओळ कवी त्यात म्हणतात

भरली दुथडी
पाण्याखाली खेडी
मंदिरात घंटा घणघणे
सगळं संपलं असे शेवटी म्हणतात
तेंव्हा
शब्दांची अंघोळ
अर्थाचा कल्लोळ
कवितेची ओळ भिजलेली

मित्रा, या कवितेने ही वाचकाचे गाल अश्रूंनी नाही भिजले तरच नवल.

कुजबुज या कवितेत कवीने मानवी मनाच्या कुजबुज करण्याच्या प्रवृत्तीवर ताशेरे ओढले आहेत आणि शेवटी लिहिले आहे

त्यांच्याजवळ आहे एक गूजगोष्ट
जिच्यात आहे थोडी कुजबुज
जी लावू शकते आग
राजमार्गाला
कुठल्याही प्रकारची जाळपोळ न
करता.

या काव्य संग्रहात शेवटची कविता आहे, मागणं

तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असलेलं जग आणि वाद,भांडणे आणि जगण्याची चाललेली तडफड यासाठी कवी मागणं या कवितेत म्हणतात

बंदुकीच्या नळकांडीत
चिमणीनं करावा खोपा
बॉम्बचे व्हावेत रंगीबेरंगी फुगे
झेंड्यांनी दाखवावी दिशा फक्त
वाऱ्याची

किती सुंदर आहे हे मागणं

असं हे सुंदर मागणं असलेला नितांत सुंदर कविता संग्रह म्हणजे तथापि होय. कवीला हे सगळं असं हवं असावं, या विश्वात. तथापि हे नसण्याची खंत असावी.

हा काव्य संग्रह घेऊन प्रत्येकाने वाचावा आणि जगण्यातील आंबट गोड पणा अनुभवावा, इतका सुंदर आहे.

या काव्यसंग्रहाचे मर्म इतकं उत्कट आहे की एबीपी माझा सारख्या लोकप्रिय मराठी चॅनेलला ही याची दखल घ्यावी लागली. कवी श्री दासू वैद्य यांच्याशी तथापि बद्दल गप्पागोष्टी कराव्या वाटल्या.

मित्रा दासू तुझे खुप खूप अभिनंदन.

असेच आम्हा वाचकांना आणखी नवे नवे आवडते (वाचनीय) खाद्य पुरवशील यात काही शंका नाही.

काव्यसंग्रह : तथापि
प्रकाशक : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
मुखपृष्ठ आणि मांडणी : चंद्रमोहन कुलकर्णी
एकूण पृष्ठ : ११६ किंमत : ३५० रुपये

# ऋणानुबंध

**ज्योतिर्मय साहित्य**

खूप वर्षापूर्वी एक टीव्ही सिरीयल पाहिली होती, ती लक्षात राहिली कारण राजेश खन्ना यांनी काही भागात अभिनय केला होता. सिरीयलचे नाव होते ''मानो या ना मानो'', कथा पण चांगल्या होत्या, अघटीत घडल्या जाणाऱ्या घटनांवर आधारित होत्या. कुठलीतरी एक अनामिक शक्ती आहे ती तुमच्याकडून चांगले, वाईट काम करून घेते, ती शक्ती आहे अशी अनुभूती येणाऱ्या काही कथा! हे सगळं सांगण्याचे कारण म्हणजे तो मित्र, या असल्या गोष्टींवर विश्वास न ठेवणारा. जात, धर्म, दैवी शक्ती, चमत्कार वगैरे वगैरे...

त्यामुळे त्याला कुणाबरोबर बोलावे हे समजत नव्हते. म्हणून तो अगदी त्याचा खास मित्राकडे आलेला. थोडे बोलायचे आहे रे! आहे ना घरी, बायकोच्या शिव्या खात खात मदत करत असणार!दोघेही फोनवर बोलत होते. येरे आहे घरीच, आता काय आरामच असतो. घरी त्याच्यासमोर, तो बोलू लागतो. तुला तर माहीतच आहे की देव, धर्म चमत्कार वगैरे वगैरे वर माझा विश्वास नाही, पण या वर्षी काही अशा घटना घडल्या त्यामुळे थोडं वेगळं वाटायला लागले हे मात्र खरे! असे काय घडले? मित्राने विचारले आणि तो बोलू लागला...

माझे वडील जाऊन २५ वर्षे झाली. मी पक्ष पंधरवडा, पितृपक्ष वगैरे करत नाही. पाहिले वर्ष श्राद्ध केले होते तेही नाईलाजाने! किंवा सर्व नातेवाईकांसाठी म्हणून. पण या वर्षी एक कावळा पितृपक्षात घरात आला होता! मी बायकोला सांगितले तर ती म्हणाली तुमच्या वडिलांची तिथी होती त्याच दिवशी! नंतर आईच्या तिथीला पण एक कावळा घरात येऊन गेला. नंतर मी माझ्या पद्धतीने विचार केला की आईवडील दोघेही



मला आशीर्वाद द्यायला आले असावे! दोघांचे माझ्यावर अतिशय प्रेम होते आणि मलाही आईवडील गेले आहेत असे कधीच वाटत नाही! ते कायम बरोबर आहेत असेच वाटते, वाटत रहाणार जो पर्यंत मी जिवंत आहे तो पर्यंत नक्कीच.पण त्या दिवसापासून असे एक मनात दडून बसलेली एक भावना...



सतीश इंदापूरकर
पुणे

म्हणजे मी मेल्यानंतर परत मला माझ्या आई वडिलांबरोबर रहाता येणार! का मला ७० वर्ष पूर्ण होऊन ७१ वें वर्ष सुरू झाले म्हणून? का मला आठवण करून देण्यास की मी जाऊन २५ वर्षे झाली म्हणून?

बाकी याचा अर्थ कसा काढायचा हे तू ठरव. पण एक सांगू का? या मुळे मृत्यूची भीती वाटत नाही उलट उरलेल्या आयुष्यात आनंदाने जगण्यासाठी बळ मिळाले आहे

आणि मेल्यानंतर देव आहे का नाही हा विचार मनात न येता आईवडील दोघे परत भेटणार आणि आयुष्यात त्यांच्या बाबतीत काही चुकले असेल तर ते सुधारणार. या त्यांनी दिलेल्या आयुष्यात मला माझ्या मनाप्रमाणे वागू दिले! आता मात्र असे ठरवले की ते सांगतील त्याप्रमाणे करायचे...

तो घरी गेला आणि बायकोला म्हणाला काहीतरी गोडधोड कर जेवायला, काहीजणांना जेवायला पण बोलवू या! आज काय ७१ वा वाढदिवस साजरा करायचा आहे का?

नाही ते नाही! वडील जाऊन २५ वर्षे झाली त्याची सिल्व्हर ज्युबिली साजरी करायची आहे...

***

# महासत्ता भारत - सोनेरी भविष्याची वाटचाल

भारताला २०४७ पर्यंत महासत्ता बनवण्यासाठी सामाजिक न्याय आणि आर्थिक समानता हे दोन आधारस्तंभ कसे महत्त्वाचे आहेत, हे दर्शवते. देशातील प्रमुख घटकांकडे (अदानी, अंबानी, राजकारणी, व्यावसायिक आणि मोठी मंदिरे) जी प्रचंड केंद्रीभूत संपत्ती आहे, तिचा वापर प्रत्येक भारतीय कुटुंबाला किमान १ कोटी रुपये देण्यासाठी केला जावा, ही कल्पना केवळ आर्थिक नाही, तर ती एका सामाजिक क्रांतीची हाक आहे. २०४७ हे वर्ष भारताच्या इतिहासातील एक निर्णायक टप्पा आहे. याच वर्षी आपला देश स्वातंत्र्याची शताब्दी पूर्ण करेल. एकेकाळी सोन्याचा धूर निघत होता असे वर्णन असलेल्या या भूमीला पुन्हा विश्वगुरू आणि आर्थिक महासत्ता म्हणून प्रस्थापित करण्याचे स्वप्न प्रत्येक भारतीय पाहत आहे. आपले हे स्वप्न कसे साकार होईल, याची कल्पना केली तर खरंच २०४७ पर्यंत आणि त्यानांतर माझा भारत महासत्ता होणारच.

लोकसंख्या आणि युवा शक्तीचे रूपांतरण

सध्या (२०२५) भारताची लोकसंख्या अंदाजे १४६.३९ कोटी आहे. ही प्रचंड लोकसंख्या काही जणांना आव्हान वाटू शकते, पण २०४७ पर्यंत भारत या लोकसंख्येला एक अभूतपूर्व मनुष्यबळ म्हणून वापरेल. विशेषतः युवा शक्ती जागतिक स्तरावर सर्वात मोठी असेल. कृत्रिम बुद्धिमत्ता (), ग्रीन एनर्जी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये भारतीय तरुण नेतृत्व करतील, ज्यामुळे उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता लक्षणीयरीत्या वाढेल.

आर्थिक समानता आणि सामाजिक न्याय

आपल्या मनात सर्वात मोठा प्रश्न आहे तो म्हणजे राजकारण्यांकडे असलेली प्रचंड संपत्ती आणि सामान्य जनतेचा संघर्ष.

संपत्तीचे विकेंद्रीकरण :

२०४७ पर्यंत, मजबूत लोकशाही संस्था आणि कडक नियमांमुळे या प्रचंड संपत्तीचे केंद्रीकरण कमी होईल. नमूद केल्याप्रमाणे, ''प्रत्येक भारतीय कुटुंबात १ कोटी दिले तरी पुरून उरेल एवढा पैसा राजकारण्यांकडे आहे,'' ही स्थिती बदलण्यासाठी कठोर भ्रष्टाचार विरोधी कायदे आणि पारदर्शक आर्थिक धोरणे लागू होतील. ही संपत्ती लोकांच्या कल्याणासाठी, पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी आणि रोजगार निर्मितीसाठी वापरली जाईल.

गरीबी निर्मूलन: संपत्तीच्या या न्यायपूर्ण वितरणातून प्रत्येक भारतीय कुटुंबाला घरे मिळतील आणि कर्जबाजारीपणा कमी होईल. आरोग्यसेवा आणि शिक्षण पूर्णपणे सुलभ आणि गुणवत्तापूर्ण होतील, ज्यामुळे सामान्य जनता आपले स्वप्न पूर्ण करू शकेल आणि सुधारित जीवन जगू शकेल. हे केवळ आर्थिक प्रगती नसून सामाजिक न्यायाच्या स्थापनेचे प्रतीक असेल.



प्रा.भगवान केशव गावित
कार्याध्यक्ष, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉई फेडरेशन, पुणे जिल्हा
मो.नं. ९३०७००५४३१

सुजलाम सुफलाम भारताची पुनर्स्थापना

२०४७ चा भारत हा केवळ आर्थिक महासत्ता नसेल, तर तो पर्यावरणाच्या दृष्टीनेही समृद्ध असेल. भारत सुजलाम सुफलाम होईल या संकल्पनेत जलव्यवस्थापन, नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि शाश्वत शेतीचा समावेश आहे.

हरित क्रांती २.०: हवामान बदलाला तोंड देण्यासाठी भारत हरित ऊर्जा आणि जैविक शेतीला प्राधान्य देईल. यामुळे शेती अधिक फायदेशीर बनेल आणि आपल्या अन्न-धान्याच्या उत्पादनात केवळ स्वयंपूर्णता नाही, तर जागतिक स्तरावर नेतृत्व करण्याची क्षमता प्राप्त होईल.

शहरांचे आधुनिकीकरण :

स्मार्ट सिटी प्रकल्प केवळ शहरी भागापुरते मर्यादित न राहता, प्रत्येक गाव आधुनिक सुविधांनी युक्त असेल. उत्तम रस्ते, २४ तास वीज आणि वेगवान इंटरनेट कनेक्टिव्हिटी ग्रामीण अर्थव्यवस्थांना चालना देतील.

कल्पनेचे तात्काळ आणि सकारात्मक परिणाम

या संपत्ती वितरणातून खालील सकारात्मक बदल घडतील.

गरीबी निर्मूलन आणि स्वप्नपूर्ती:

प्रत्येक कुटुंबाला १ कोटी मिळाल्यास, दारिद्र्य रेषेखालील () कुटुंबांना त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याची आणि त्यांची स्वप्ने पूर्ण करण्याची ताकद मिळेल.

सर्वांसाठी घर:

घर नाही त्याला घर मिळेल हे स्वप्न त्वरित साकार होईल. कोट्यवधी रुपयांच्या भांडवलामुळे प्रत्येक कुटुंबाला पक्के आणि सुरक्षित घर बांधणे शक्य होईल, ज्यामुळे निवाऱ्याची समस्या कायमस्वरूपी सुटेल.

कर्जमुक्ती आणि आर्थिक स्वातंत्र्य: कर्जबाजारीपणामुळे त्रस्त असलेल्या कोट्यवधी कुटुंबांचे कर्ज त्वरित फिटेल. यामुळे मानसिक ताण कमी होईल आणि हे लोक पुन्हा आर्थिक चक्रात सक्रियपणे सहभागी होऊ शकतील.

समाजाचे सक्षमीकरण: ''लोक सुधान होतील.'' याचा अर्थ केवळ आर्थिक सुधारणा नाही, तर शिक्षण, आरोग्य आणि जीवनशैलीत सुधारणा होईल. प्रत्येक नागरिकाचे जीवनमान उंचावेल.

**(क्रमशः)**

**हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)** E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559